# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे ईदमध्ये २ लाख लोकांना अन्नवाटप

**पुणे :** 'कोविड-१९'च्या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशन या त्यांच्या सीएसआर भागीदाराने शेरू विकास खत्रा आणि मॅक्सिमस कोसॉबिसच्या साथीने ईद फिस्ट २०२० या उपक्रमाला पाठिंबा दिला. या उपक्रमातून ५ हजार कुटुंबांना फळे आणि भाज्या पुरवण्यात आल्या आणि रमजान साजरी करण्यासाठी २ लाख लोकांना अन्न पुरवण्यात आले. पवित्र हाजी अली दर्गाचे आशीर्वाद घेऊन या दावतीची सुरुवात झाली आणि त्यानंतर योग्य सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळत हे अन्न मुंबईत (मोहम्मद अली रोड, धारावी आणि माहीम दर्गा) वाटण्यात आले. मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, या संकटाने समाजातील वंचित गट फारच अडचणीत सापडला आहे. या काळातही आपण एकत्र आहोत, हे यातून आम्ही सांगू इच्छितो. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश छाब्रिया म्हणाले, आम्ही स्थलांतरित, झोपडपट्टीत राहणारे, रोजंदारी कामगार यांना अन्न, किराणा, पाणी, गरम जेवणाची पाकिटे, मास्क आणि इतर आवश्यक वस्तू पुरवून साह्य करत आहोत. आमच्या सीएसआर फाउंडेशनमध्ये मदतीची दारे कधीही बंद होणार नाहीत. मुकुल माधव फाउंडेशनतर्फे गरजूंना कोरडे धान्य, फळे आणि भाज्याही पुरवल्या जातात.